# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक :- ७८-२३** **दिनांक :- ०८/०३/२०२३**

## ०३ अल्पवयीन अपहृत मुलींचा ०६ तासाचे आत शोध घेण्यास काशिमीरा पोलीस ठाणेस यश.

दिनांक ०६/०३/२०२३ रोजी १६.०० वा. सुमारास ०३ अल्पवयीन मुली वय ११ वर्ष, १३ वर्ष व १४ वर्ष हया मिरा गाव येथील वंदना चक्रे गार्डनमध्ये खेळण्यासाठी गेल्या होत्या. सदरच्या मुली १९.०० वाजपर्यंत घरी परत न आल्याने मुलींचे पालकांनी त्यांचा आजुबाजुच्या परिसरात शोध घेतला परंतु त्या मिळुन न आल्याने फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन काशिमीरा पोलीस ठाणेत गु.रजि.नं. १७३/२०२३ भा.द.वि.सं. कलम ३६३ अन्वये दिनांक ०७/०३/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे गांभिर्य व संवेदनशिलता लक्षात घेवुन सदर अपहृत मुलींचा शोध घेणेबाबत वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शप्रमाणे काशिमीरा पोलीस ठाण्याचे अधिकारी व अंमलदार यांचे पथक नियुक्त करण्यात आले. सदर गुन्हयाचा तांत्रिक विश्र्वेशनाव्दारे प्राप्त माहितीच्या आधारे अपहृत तिन्ही मुली मुंबई कडून गोवा कडे मांडवी एक्सप्रेसमधुन जात असल्याचे निष्पन्न झाले. सदर ट्रेनचे लोकेशन तालुका खेड, जिल्हा रत्नागिरी येथे असल्याने खेड पोलीस ठाणे येथील पोलीसांशी संपर्क करुन त्यांना सदर गुन्हयाची व अपहृत मुलींची माहिती देवुन खेड पोलीसांचे मदतीने अपहृत तिन्ही मुलींना मांडवी एक्सप्रेस मधुन ताब्यात घेवुन त्यांना त्यांच्या पालकांच्या ताब्यात सुखरुपपणे देण्यात आले आहे.

सदरची कामगिरी श्री. जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १, श्री. विलास सानप, सहायक पोलीस आयुक्त, मिरारोड विभाग यांचे मार्गदर्शनाखाली व.पो.नि. श्री. संदीप कदम, स.पो.नि. टिकाराम थाटकर, पो.उप.नि. निखील चौहान, पो.हवा. सुधीर खोत यांनी खेड पोलीसांचे मदतीने केली आहे.

----oooo-----

.